**टंचाईग्रस्त गावांतील हंगामी प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांचा बीज पुरवठा खंडीत न करण्याबाबत..**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन परिपत्रक, क्रमांक ग्रापायो-१११२/प्र.क्र.५०/पापु-०७**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ दिनांक : २७ मार्च, २०१२**

वाचा : शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र.बैठक २००८/ प्र.क्र.१५४६/ऊर्जा-५, दिनांक २४ जुलै, २००८

प्रस्तावना :

राज्यातील पाणी टंचाईग्रस्त गावांमधील हंगामी प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांचा बीज पुरवठा खंडीत न करणे व यासाठी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीने मागणी केल्यानुसार अशा पाणी टंचाईग्रस्त गावांमधील हंगामी प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांचे विज देयके अदा करण्यासाठी जिल्हा स्तरावर आवश्यक तो निधी उपलब्ध असावा यासाठी सूचना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन परिपत्रक :

राज्यात निर्माण झालेली पिण्याच्या पाण्याची टंचाई विचारात घेता, राज्यातील पाणी टंचाईग्रस्त गावांतील हंगामी प्रादेशिक पाणी पुरवठा योजना, बीज देयकाची अदायगी न झाल्याने बंद राहू नयेत यासाठी, पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

२. राज्यातील पाणी टंचाईग्रस्त गावांमधील हंगामी प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांची मार्च, २०१२ ते जून, २०१२ पर्यंतची चालू विज देयके संबधित गावांनी न भरल्यास ती संदर्भाधीन शासन निर्णयान्वये जिल्हास्तरावर जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेखाली बीज भारनियमनासंदर्भात स्थापन करण्यात आलेल्या समितीमार्फत भरण्यात येतील.त्यामुळे राज्यातील पाणी टंचाईग्रस्त गावांमधील हंगामी प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांचा विज पुरवठा दिनांक ३० जून २०१२ पर्यंत म्हणजेच टंचाई कालावधीत खंडीत होणार नाही, याची सर्व जिल्हाधिका-यांनी दक्षता घ्यावी.

३. संदर्भाधीन शासन निर्णयान्वये जिल्हास्तरावर जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेखाली वीज भारनियमनासंदर्भात समन्वय समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीस पुढीलप्रमाणे अधिकार देण्यात येत आहेत.

अ) ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचा वीज पुरवठा सुरळीत राहण्यासाठी निर्णय घेण्यास ही समिती सक्षम राहील.

ब) चालू वीज देयकांची अदायगी महावितरण कंपनीस करण्यासाठी ही समिती, जिल्हास्तरावर राष्ट्रीयकृत किंवा शेड्युल्ड बँकेमध्ये तातडीने स्वतंत्र बचत खाते उघडेल.

क) हे बचत खाते समन्वय समितीचे अध्यक्ष व सदस्य सचिव, यांचे नावे उघडण्यात येईल व त्यांचेकडून संयुक्तपणे चालविण्यात येईल.

ड) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी त्यांच्याकडील जिल्हा देखभाल दुरुस्ती निधी तसेच ग्रामपंचायत व जिल्हा परिषदेच्या स्वउत्पन्नातील निधी गरजेनुसार, समितीने उघडलेल्या उपरोक्त बचत बँक खात्यात ठेव म्हणून त्वरीत जमा करावा. हा निधी कमी पडल्यास इतर निधीतून आवश्यक निधी जमा करावा.

४. वरीलप्रमाणे जमा झालेल्या निधीतून करावयाच्या खर्चाबाबत पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१) शासनाकडून संबंधित ग्रामीण हंगामी प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेस देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदान म्हणून प्राप्त झालेल्या निधीतून या योजनांनी केलेला खर्च, भरलेली वीज देयके यांची खातरजमा समितीने करावी.

२) टंचाईग्रस्त गावातील हंगामी प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांनी चालू वीज देयके भरली नाहीत तर त्याबाबतची माहिती महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीने समितीच्या विचारार्थ सादर करावी.

३) महावितरण कंपनीने माहिती सादर केल्यानंतर समितीने प्रथमत: संबंधित योजनेस उपलब्ध झालेल्या देखभाल दुरुस्ती निधीतून / अथवा इतर निधीमधून चालू देयके भरणे शक्य असल्यास तसे संबंधित योजनेस समितीकडून कळविण्यात येईल.

४) वरील क्रमांक ३ प्रमाणे वीज देयके ग्राम पंचायतीस अदा करणे शक्य नाही, असे समितीस वाटत असेल तर समितीने ग्रामपंचायतीस चालू वीज देयके अदा करणे का शक्य होत नाही

याची कारणे नोदंवावी आणि नंतर जिल्हास्तरावरील समितीच्या खात्यातून समितीने योजनेची चालू बीज देयके अदा करावीत.

५) समितीद्वारे अदा करण्यात आलेल्या निधीची प्रतिपूर्ती मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी संबंधित ग्राम पंचायतीस / जिल्हा परिषदेस उपलब्ध इतर निधीतून करावी.

६) समितीच्या खात्यातून देण्यात आलेला निधी आणि लागणारा निधी याची माहिती समितीने शासनास दरमहा सादर करावी.

७) महावितरण कंपनीस अदा करण्यासाठी समितीस जास्त निधीची आवश्यकता लागल्यास, जिल्हा परिषदेने आवश्यक तेवढा निधी समितीच्या खात्यात पुन्हा जमा करावा आणि त्या रकमेची प्रतिपूर्ती उपरोक्त ५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे करण्यात यावी.

६. वरील आदेश मार्च २०१२ ते जून २०१२ च्या चालू बीज देयकांच्या प्रतिपूर्तीसाठी लागू राहतील.

७. वरीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला असल्याने टंचाई ग्रस्त गावातील हंगामी प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांचा बीज पुरवठा चालू बीज देयकांच्या अदायगी अभावी मार्च २०१२ ते जून, २०१२ या कालावधीत समितीच्या पुर्वपरवानगी शिवाय खंडीत होणार नाही, याची दक्षता जिल्हाधिकारी यांनी घ्यावी.

८. या परिपत्रकातील सूचना जून, २०१२ पर्यंतच अंमलात राहतील.

९. वरील शासन परिपत्रक ग्राम विकास विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

१०. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेब साईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक **२०१२०३२७१०२८२०३२०००१** असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(ल.गो.ढोके)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,
मा.मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता ) यांचे खाजगी सचिव,
मा.राज्यमंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव
खाजगी सचिव, मा.मंत्री (सर्व)
खाजगी सचिव, मा.राज्यमंत्री (सर्व)
विभागीय आयुक्त (सर्व)
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
F:\CR 050 12 circular.docx